# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २९ /१२/२०१७**

**दु ११.३० वा.**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.१२/१२/२०१७ रोजींचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. २७/१२/२०१७ रोजींचे इतिवृत्त कायम करणेंस आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर नाना पाटील सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपिस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील वॉर्ड नं. ९२ मध्ये संत जलाराम बापू नगर येथे आर.सी.सी. गटार बांधणे. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामाच्या रक्कम रु. ७४९२३८२/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | अग्निशमन विभागात कार्यरत कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांना स्कुबा डाईव्हींग प्रशिक्षण देणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील उर्वरीत कर्मचाऱ्यांकरीता स्कुबा डाईव्हींगचे प्रशिक्षण देणेकरीता रक्कम रु. ७५,०००/- (अक्षरी रु. पंच्चाहत्तर हजार मात्र) एवढ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपिस सूचक :- मा.श्री. सखाराम महाडिक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४. | डास नियंत्रण व डास निर्मुलन करणेकामी जंतुकिटकनाशके खरेदी करण्यात मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सभागृहात विस्तृत चर्चा करणेंत आली. सद्यस्थितीत हिवाळ्याचे दिवस असून डासांची वाढ मोठ्या प्रमाणात होत आहे. महानगरपालिकेकडे जंतूनाशके/किटकनाशके साठा संपत आलेला असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ अधिनियम अनुसूची (ड) मधील कलम ५ (२) (२) नुसार पात्र व कमी दराच्या वरील निविदाधारकांकडून जंतूनाशके/किटकनाशके खरेदी करण्यांस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. जंतूनाशके/किटकनाशके खरेदी केल्यानंतर मे. श्रीराम ॲग्रो एजन्सीज. पो. बार्शी, जि. अमरावती व मे. डहाणू अग्रो ट्रेडींग कार्पोरेशिन, डहाणू, जिल्हा.पालघर यांना बिलाप्रमाणे होणारी रक्कम अदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर नाना पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | प्रभाग समिती (आय) कार्यक्षेत्रातील विविध रस्त्यांवर थर्माप्लास्ट पेंटचे पट्टे | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र, ४२ दि. १४/०६/२०१६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे. मॅनदिप एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) |

| | | |
|---|---|---|
| | मारणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ११.११% कमी दराने लघुत्तम आहे. तसेच मे.शान एंटरप्रायजेस निविदेमधील भरणा केलेल्या दराने काम करणेंस इच्छुक नसल्याने त्यांची निविदा रद्द करण्यांत येत असून त्यांची इसारा रक्कम जप्त करणेंत येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या चेतन पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | प्रभाग समिती जुना ई नविन आय कार्यालय क्षेत्रातील जुना वॉर्ड क्र.८० नविन (१०६) मधील साधु आश्रम ते कस्टम ऑफिस पर्यंत सी.सी.गटार बांधणे हे काम रद्द करणेबाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. सदरचे काम हे दोन वर्षापूर्वी मंजूर झाले असून सदर गटाराचे काम डि.पी. रस्ते सोडून करावयाचे असल्याने तसेच नागरीकांची शेतजमिनी मोठ्या प्रमाणात गटाराच्या कामात येत असल्याने सदर काम करणेंस नागरीकांनी मोठ्या प्रमाणात विरोध दर्शविला असल्याकारणाने सदर काम करतात येणे शक्य नाही. तरी सदरचे काम रद्द करुन ठेकेदार यांनी भरलेली इसारा रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम परत करणेंस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडीक सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिकेने केलेली विकास कामे व सेवांची डॉक्युमेंट्री फिल्म तयार करणे कामी एजंन्सींची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५ (२) (२) अन्वये नियुक्ती विना निविदा करणे व वाटाघाटीने कमी केलेल्या खर्चास मान्यता देणे बाबत. | ठराव :- सदर कामास मे. पद्मश्री प्रोडक्शन प्रा.लि. पुणे ह्या एजन्सीची विना निविदा नियुक्ती करून होणाऱ्या रक्कम रू. १५.९८ लाख खर्चास ही सभा वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या चेतन पाटील सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वालईपाडा येथील बमबम चाळीपासून ते मुख्य नाल्यापर्यंत गटार बांधणे कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदरच्या कामा येणाऱ्या रू. १४२२८५१/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेंस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ९. | वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान व स्वच्छ वसई विरार मिशन यशस्वीपणे राबविणेकरीता स्पर्धा आयोजित करणेबाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. या कामी सदर स्पर्धांच्या बक्षिसांसाठी व कार्यक्रमाच्या अनुषंगाने मंजुर वार्षिक ठेक्याव्यतिरिक्त काही कामांसाठी दरपत्रक मागवून काम करण्यास येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या चेतन पाटील सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र. ३८ मधील नालेश्वर नगर येथील ओम साई निवास ते साई दया अपा. पर्यंत आर.सी.सी पाईप गटार बांधणे. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ३० दि. २८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या मे. जिवदानी एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) १०.५७% कमी दराने लधुत्तम आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. यात ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. २७/११/२०१७ ते दि. ०३/१२/२०१७ व दिनांक ४/१२/२०१७ ते दि. १०/१२/२०१७ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घनांचे प्रतिवृत्त माहितीसाठी स्थायी समिती सादर. | ठराव :- सदर बाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रस्तावातील माहिती मा.स्थायी समिती सभेत अवलोकन केली. त्यानुसार संबंधितांने नोंद घेवून कार्यवाही करणेंस सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. स्वप्नील बांदेकर सूचक :- मा.श्री.सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका